फौज.मा.अर्ज क्र.२३६/२०२०
कौशल्या -वि- सचिन व इतर
नि.क्र.१ वर

## फिर्यादीचे शपथेवरील सत्यापन

नाव : कौशल्या सिद्धार्थ नगरारे
वय : ४० वर्ष, धंदा खाजगी
रा. : प्लॉट नं.२८, अहेरराव ले आउट, बालाजी नगर, उमरेड तह. उमरेड, जि. नागपूर.

आरोपी हे माझे लहान भाऊ सचिन व त्याची पत्नी करिश्मा सचिन गेडाम हे आहेत. दि.२८.०९.२०२० रोजी सकाळी १०:३० वाजता मी पानी भरण्याकरिता बोरवेल कडे निघाली. त्यावेळी आरोपी करिश्मा हिने मला 'लैला लैला' म्हणून गाणे म्हटले. त्यानंतर मी पानी भरल्यानंतर गेट उघडून निघाली असता आरोपी सचिन याने मला शिवीगाळ केली. त्याने मला 'भोसळाचोदे, माझे घरातून निघून जा, भिकारबोळे माझे घरातून निघून जा' अशी अश्लील शिवीगाळ केली. आरोपींनी म्हटले की 'तुला व तझ्या मुलीला मारीन, आमच्या या घरी राहायचे नाही', अशी धमकी दिली. आरोपीने असे म्हटले की, 'तुझा यार आहे का, तु बाहेर भेटायला जाते'. त्यानंतर मी पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट देण्याकरिता आली. पोलीसांनी माझे रिपोर्टवर काही कार्यवाही केली नाही. आरोपी हा नेहमी दारू पिवून राहत असल्याने त्याच्यापासून मला भिती निर्माण झाली आहे.

म्हणून ही केस न्यायालयात दाखल केली. आरोपींनी जिवाने मारण्याची धमकी दिली. करिता आरोपीविरूध्द कार्यवाही करण्यात यावी.

(कौशल्या सिद्धार्थ नगरारे)

वा.दा.ब.अ.क.केले

समक्ष

न्या.दं.प्र.श्रे.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, उमरेड
दि : १०.१२.२०२०

फौज.मा.अर्ज क्र.२३६/२०२०
कौशल्या -वि- सचिन व इतर
नि.क्र.१ वर

## साक्षीदाराचे शपथेवरील सत्यापन

साक्षीदार ही अज्ञान असल्याने तिला खालीलप्रमाणे प्राथमिक प्रश्न विचारण्यात आले :-

नाव : कु. श्रुती सिद्धार्थ नगरारे
वय : १४ वर्ष, व्यवसाय : शिक्षण
रा. : बालाजी नगर, उमरेड, तह. उमरेड, जि.नागपूर.

प्रश्न क्र. १ : तु सध्या काय करते ?
उत्तर : मी १० वी शिकत आहे.

प्रश्न क्र.२ : तुझे वर्गशिक्षक कोण आहेत ?
उत्तर : माझे वर्गशिक्षक निशाणे सर आहेत.

प्रश्न क्र. २ : तुझा देवावर विश्वास आहे काय ?
उत्तर : मी देवाला मानते.

प्रश्न क्र.३ : तुला शपथेचे गांभीर्य समजते का ?
उत्तर : होय.

साक्षीदार ही समंजस दिसुन येते व तिला शपथेचे गांभीर्य समजते.

मी शपथेवर सांगते की,

दि.२८.०९.२०२० रोजी आरोपी क्र.१ ने माझ्या आईला म्हटले की, 'गेट खुले का ठेवले'. त्यामुळे माझे मामा सचिन यांनी माझ्या आईला 'तु भिकारी आहे का, तुला भिक लागली का, भिकारबोळे' अशी अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर माझे आईला घरातून निघून जा नाहीतर तूला व तुझ्या मुलीला मारून टाकीन

अशी धमकी दिली. त्यानंतर माझे आईने पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट दिला होता. त्यानंतर पोलीसांनी काही कार्यवाही न केल्याने ही तक्रार न्यायालयात दाखल केली आहे.

(कु. श्रुती सिद्धार्थ नगरारे)

वा.दा.ब.अ.क.केले समक्ष

न्या.दं.प्र.श्रे.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, उमरेड
दि : १०.१२.२०२०